**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA**
PHONE - EPABS-0091-0231-2609000 FAX NO. -0091-0231-2691533 & 0091-0231 2692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र
**University WEBSITE : www.unishivaji.ac.in**

**Estd : 1962**
**"A++" Accredited by**
**NAAC (2021) with CGPA 3.52**

**Prof. Dr. R. V. Gurav**
**Director, Students' Development**
**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/६५४ दि. ०७/१२/२०२१

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व संलग्न महाविद्यालये व सर्व मान्यताप्राप्त शिक्षण संस्था, व
मा. विभागप्रमुख, पदव्युत्तर अधिविभाग, कोल्हापूर.

**विषय :– शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मधील आयोजित करावयाचे युवा महोत्सवाबाबत.**

संदर्भ :– १) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचा ब्रेक द चेन आदेश क्र. कोरोना–२०२१/प्र.क्र.४२१/आ–५, दि. ०६ ऑक्टोबर, २०२१ रोजीचा आदेश
२) या विभागाचे संदर्भ क्र. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/६२१ दि. २६ नोव्हेबर, २०२१ रोजीचे पत्र
३) महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय,मुंबई–४०००३२, यांचा क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम–१, दिनांक: २७ नोव्हेबर, २०२१ रोजीचा आदेश

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भांकित शासन निर्णय आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे परिपत्रकानूसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यीत विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याबाबत सूचना आदेश तसेच एस.ओ.पी.मध्ये नमूद केल्यानुसार अंमलबजावणी करुन महाविद्यालये दि. २० ऑक्टोबर, २०२१ पासून सुरु करण्यात आलेली आहेत. शैक्षणिक उपक्रमासोबत विद्यार्थ्याचा सर्वागिण विकास होण्यासाठी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याचे संकेत अखिल भारतीय विद्यापीठ संघटना, नवी दिल्ली यांचे संदर्भ पत्र क्र एआययू/एएससी/२०२१–२२, दि. ०५ ऑक्टोबर, २०२१ व युवा महोत्सवाबाबत मा. संयुक्त सचिव, भारतीय विश्वविद्यालय संघ, नवी दिल्ली यांचे संदर्भ क्र. एआययू/वायए ॲण्ड एस/२०२१–२२/वायए–प्रो/१ दि. २२ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या पत्रानुसार सर्व विद्यापीठांना मिळाल्या आहेत. यासाठी कोविड–१९ या संसर्ग रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र कोविड–१९ उपाययोजना नियम २०२० अंमलात आलेले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ मध्ये अखिल भारतीय आंतर विद्यापीठ संघटना, नवी दिल्ली यांचेवतीने, विभागीय, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत कळविण्यात आल्यानूसार शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग अंतर्गत येणाऱ्या कोल्हापूर,

सांगली व सातारा जिल्हा या विभागाच्या कक्षेत आंतर महाविद्यालयीन जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवाचे आयोजन करणेत येत आहे. त्याकरीता खालील उपाययोजना सर्व सांस्कृतिक स्पर्धाकरीता अंमलात आणावी जेणेकरुन कोविड १९ संसर्ग नियंत्रात राहिल.

### अ. कोविड—१९ सामान्य प्रतिबंधात्मक उपाय :—

कोविड—१९ चा धोका कमी करण्यासाठी खालील सार्वजनिक आरोग्य उपायाचे पालन केले पाहीजे (सांस्कृतिक समन्वयक, प्राध्यापक, विद्यार्थी आणि युवा महोत्सवासाठी आवश्यक सर्व कर्मचारी) यांनी युवा महोत्सवाच्या काळात खालील गोष्टीचे पालन करावे.

१. शक्य तेवढे कितान ६ फुटाचे अंतर पाळावे
२. मास्क/फेसकव्हरचा वापर करणे अनिवार्य आहे.
३. हात जरी स्पष्टपणे घाणेरडे नसले तरी साबणाने अगर हॅण्डवॉशने वारंवार हात धुणे (किमान ४०—६० सेकंदासाठी) शक्य असेल तेथे करणे.
४. श्वसन शिष्टाचार काटेकोरपणे पाळले पाहिजेत. यामध्ये शिकताना टिश्यु/रुमाल/लवचिक कोपराने तोंड आणि नाक झाकने आणि वापरलेल्या वस्तूची योग्यप्रकारे विल्हेवाट लावणे यांचा समावेश आहे.
५. सर्वानी स्वत:च्या आरोग्याचे स्वत: निरीक्षण करणे आणि कोणत्याही आजाराची लवकरात लवकर माहिती देणे.
६. युवा महोत्सव कालावधीत युवा महोत्सवाच्या परिसरात थुंकण्यास सक्त मनाई आहे.
७. आरोग्य सेतू ॲप डाउनलोड करणे आणि शक्य तेथे वापर करण्याचा सल्ला दिला जाईल.

### ब. युवा महोत्सव प्रतिबंधात्मक उपाय :—

१. महाविद्यालयामधील सांस्कृतिक समन्वयक, विद्यार्थी विकास विभागाशी संबंधित सेवक वर्ग यांचे कोविड प्रतिबंधत्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पुर्ण होणे आवश्यक राहील.
२. लसीकरणाचे मात्रा पूर्ण झालेले प्रमाणपत्र (Certificate for COVID-19 Vaccination fully Vaccinated : 2nd Dose) विद्यार्थ्यांना स्पर्धा पात्रता अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
३. ए.आय.यु. नवी दिल्ली यांचे प्राप्त पत्रानुसार सहभागी विद्यार्थ्याचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पूर्ण झालेले अनिवार्य राहील. तथापी पश्चिम विभागीय/अखिल भारतीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव आयोजक विद्यापीठाकडून वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या नियमानुसार लसीकरणाचे दोन डोस झालेले नसल्यास अशा विद्यार्थ्यांना किमान एक डोस झालेले प्रमाणपत्र व स्वखर्चाने RTPCR चाचणी करुन ४८/७२ तासापूर्वी त्याचा **निगेटिव्ह** अहवाल युवा महोत्सवापूर्वी सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच १८ वर्षे पूर्ण नसलेल्या विद्यार्थ्यांना स्वखर्चाने RTPCR चाचणी करुन ४८/७२ तासापूर्वी त्याचा **निगेटिव्ह** अहवाल युवा महोत्सवापूर्वी सादर करणे बंधनकारक राहिल. तसेच सदर विद्यार्थांची विद्यापीठ संघात निवड झालेस त्याचा स्पर्धेला जाणेपूर्वी एक दिवस आधी RTPCR चाचणी स्वखर्चाने करुन त्याचा अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. सदर अटी पूर्ण करण्याची जबाबदारी संपूर्णपणे संबधित महाविद्यालये व विद्यार्थी यांची राहिल.

तसेच शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी दोन डोस पूर्ण नसतील तर किमान एक डोस प्रमाणपत्र व स्पर्धेपूर्वी ४८/७२ तास आगोदर RTPCR चाचणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

ज्या विद्यार्थ्यांचे वय १८ वर्षाखालील आहे त्यांचे लसीकरण अदयापही झाले. नसल्याने जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी दोन डोस पूर्ण नसतील तर किमान एक डोस प्रमाणपत्र व स्पर्धेपूर्वी ४८/७२ तास अगोदर RTPCR चाचणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. युवा महोत्सवाकरीता वापरण्यात येणारे साहीत्य व वाद्ये ही पूर्णत: सॅनिटाईज करुनच वापरात आणावीत. विना सॅनिटाईज युवा महोत्सवाचे साहित्य अथवा वाद्यांचा वापर करु नये. साहीत्य व वाद्ये यांचा वापर केल्यानंतरही हात व साहित्य सॅनिटाईज करावे.

५. युवा महोत्सवा दरम्यान तसेच प्रत्यक्ष सादरीकरावेळी सोशल डिस्टसिंगचे (Covid Appropriate Beavior) पालन करणे बंधनकारक राहील.

६. प्रत्यक्ष सादरीकरणावेळी युवा महोत्सवासाठी नियुक्त परिक्षक, महाविद्यालयाची समिती इत्यादीचे कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन मात्रा (डोस) पुर्ण झालेले असणे अनिवार्य राहील.

७. विद्यापीठाचे अंतर्गत होणारे सर्व युवा महोत्सव हे सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि. ०६ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या ब्रेक द चेन आदेशासोबत Standard Operating Procedur सहपत्रानुसार व दि. २९ नोव्हेबर, २०२१ रोजीच्या आदेशानुसार होतील.

८. प्रत्यक्ष युवा महोत्सवावेळी सॅनिटायझरची व्यवस्था करावी.

९. विद्यार्थ्यांना वसतिगृहात निवासाची वेळ आल्यास एकूण ५० टक्के क्षमतेनेच सर्व निकष पाळून निवास व्यवस्था करावी.

१०. युवा महोत्सवास सहभागी सर्व संघानी प्रवासादरम्यान सर्व प्रोटोकॉलचे पालन करावे.

११. विद्यार्थ्यांना युवा महोत्सव अयोजक महाविद्यालयाच्या क्षेत्रात प्रवेश देण्यापूर्वी विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांची तपासणी केली जाईल व त्यांनी लसीकरणाच्या दोनही मा्त्रा घेतली असणे आवश्यक असेल.

१२. युवा महोत्सवा दरम्यान निवासाचे ठिकाणी साबण, टॉवेल व इतर वस्तू हया स्वत:च्या स्वत: वापराव्यात इतरांना वापर करण्यास देवू अथवा घेवू नये.

१३. आयोजक महाविद्यालयाने युवा महोत्सव आयोजनाबाबत निर्णय हा आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कोविड—१९ च्या प्रार्दभावाचा आढावा घेवून तसेच स्थानिक प्रशासनाची परवानगी घेवून त्यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही अपेक्षित राहील.

तरी याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,



संचालक
विद्यार्थी विकास